इन्फ्लूएन्झापासून बचावासाठी ‘एसएच २४’ लस घ्या; आरोग्य मंत्रालयाचे निर्देश

■ प्रतिनिधी, मुंबई

हिवाळ्यामध्ये इन्फ्लूएंझाच्या रुग्ण संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने नागरिकांना ‘सदर्न हेम ीस्फिअर क्वॉड्रीव्हॅलेंट २०२४’ (एसएच२४) ही लस देण्याचे निर्देश दिले आहेत. ही लस चार प्रकारच्या इन्फ्लूएंझापासून संरक्षण करत असल्याने या लशीचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले असले तरी ही लस उपलब्ध नसल्यास सध्या उपलब्ध असलेली उत्तम लस नागरिकांना देण्यात यावी, असेही केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

भारतात ऑगस्टपर्यंत १५ हजार जणांना इन्फ्लूएंझाची लागण झाली असून, यातील २३९ जणांचा मृत्यू झाला आहे. हिवाळ्याम ध्ये यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असते. साधारणपणे इन्फ्लूएंझाचा



संसर्गजन्य आजार असल्याने प्रसार वेगाने होतो

सर्वाधिक त्रास हा ६५ वर्षे व त्यावरील नागरिकांना होतो. वृद्ध आणि आजारी लोकांच्या संपर्कात सातत्याने येणाऱ्या व्यक्ती, गर्भवती महिला, लहान मुले तसेच आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ही लस घेणे आवश्यक आहे.

इन्फ्लूएंझा हा संसर्गजन्य आजार असल्याने त्याचा प्रसार वेगाने होतो. हिवाळ्यामध्ये इन्फ्लूएंझासाठी पोषक वातावरण असल्याने त्याचा प्रसार अधिक होतो.

त्यामुळे त्याला आळा घालण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) ही लस घेण्याची शिफारस केली आहे.

शॉर्ट न्युज

छठ पूजेस विनोद शेलार यांची उपस्थिती

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई (प्रतिनिधी) उत्तम विकास मंचने अक्सा बीच, मालाड पश्चिम येथे आयोजित केलेल्या विश्वासाच्या आणि सूर्य उपासनेच्या या महापर्व छठ पूजेत सहभागी होण्याचा विनोद शेलार यांनी उपस्थिती दर्शवली भगवान सूर्यदेव आणि छठी मैया यांच्या उपासनेचा हा चिरंतन सण म्हणजे आध्यात्मिक आणि कृपेचा अनोखा संगम आहे. मावळत्या सूर्याची उगवत्या सूर्यासोबत पूजा करण्याची ही मोठी सांस्कृतिक परंपरा आहे. मालाड परिसरातील भाविकांच्या श्रद्धेने व पूजापद्धतीने संपूर्ण वातावरण भावूक झाले होते. यावेळी उपस्थित समाजाला संबोधित करून शेलार यांनी छठ उपवास करणाऱ्या सर्व माता, भगिनी आणि बांधवांना छठपूजेच्या हार्दिक शुभेच्छा. या कार्यक्रमात केंद्रीय सामाजिक व न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रदीप गोंड, रमेश गोंड, गुरु यादव, क्रांती शॉ, अविनाश राय, दर्शन म्हात्रे, मनोहर राय, अमन पाठक हे देखील विनोद शेलार यांच्या सोबत सामील झाले.

गोवंडीत समाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांची गुंडगिरी

■ प्रतिनिधी, मुंबई

विधानसभा निवडणुका तोंडावर मानखुर्द येथील शिवाजी नगर मतदारसंघातून धक्कादायक माहिती समोर आली. गोवंडीतील रफिक नगर भागात कचरा आणि ओसंडून वाहणाऱ्या गटारांच्या समस्यांबाबत तक्रार करण्यासाठी समाजवादी पक्षाच्या कार्यालयात गेलेली महिला आणि तिच्या सहकाऱ्यांना मारहाण करण्यात आली. संबंधित महिलेले एका व्हिडिओच्या माध्यमातून त्यांच्यासोबत घडलेला संपूर्ण प्रकार सांगितला आहे. तसेच अबू आझमींच्याविरोधात स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. व्हिडिओत महिलेच्या अंगावरील कपडे फाटलेले दिसत आहेत. सपा नेते फहाद आझमी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तिच्यावर आणि तिच्यासोबत असलेल्या लोकांवर हल्ला केल्याचे तिने म्हटले आहे. महिलेने असाही दावा केला आहे की, मारहाणीदरम्यान त्यांच्या अंगावरील कपडे फाटले आहेत. त्यांच्यापैकी एका तरुणाच्या डोक्याला दुखापत झाली असून रक्तस्त्राव होत असल्याचे दिसून येत आहे.

मंगलप्रभात लोढा यांना हायकोर्टाची नोटीस

■ प्रतिनिधी, मुंबई

मालाड-मालवणी येथील अंबुजवाडी परिसरातील झोपड्या राजकीय दबावातून पाडण्यात आल्या आणि झोपडीधारकांना बेघर केले, असा गंभीर आरोप करत सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी दाखल केलेल्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली.

न्यायमूर्ती अजय गडकरी आणि कमल खाता यांच्या खंडपीठाने भाजप नेते, मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह केंद्र व राज्य सरकार, मुंबई महापालिका, व अन्य प्रतिवादींना नोटीस बजावली. अंबुजवाडी परिसरातील नागरिकांच्या वतीने ज्येष्ठ वकील ॲड. सतीश तळेकर यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

मुंबादेवीतील अनधिकृत बांधकामांना पालिका जबाबदार

काँग्रेसच्या अमीन पटेल यांचा घणाघात

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबादेवी विधानसभा मतदारसंघातील अनधिकृत बांधकामांना महापालिकेचे विभाग अधिकारी व पोलीस यंत्रणाही तितकीच जबाबदार असल्याचा घणाघात काँग्रेसचे उमेदवार अमीन पटेल यांनी गुरुवारी केला. स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन मुंबादेवी मंदिर परिसराचा लवकरात लवकर एकात्मिक विकास करण्याबरोबरच विभागातील सर्व मंदिर, मशीद, गुरुद्वारा, दर्ग्याभोवतालच्या परिसराच्या सुशोभिकरणावर भर देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

मुंबादेवी मतदारसंघातील अनधिकृत बांधकामाच्या प्रश्नावर बोलताना अमीन पटेल म्हणाले की, अनधिकृत बांधकाम रोखण्याचा प्रयत्न दुसरे तिसरे कुणी नव्हे, तर महापालिकेचे विभागीय सहाय्यक आयुक्त हेच करू शकतात. आपल्या विभागातील अनधिकृत बांधकामांचा विषय मी सभागृहात उपस्थित केला असता तत्कालीन नगरविकास मंत्र्यांनी सांगितले, कारवाई होईल; परंतु प्रत्यक्षात काहीही झालेले नाही.

- अमित ठाकरेंविरुध्द उबाठा शिवसेनेने महेश सावंतांना उभे केल्याने माहिम विधानसभा मतदारसंघांकडे सर्वांचे लक्ष वेधले जातोय. परंतु भाजपची मते इथे परिणामकारक आहेत. त्यांची २५ टक्के मतेसुध्दा अमि तच्या पारड्यात पडली तर ते तेथून आरामात विजयी होऊ शकतील.
- माहिम विधानसभा मतदारसंघाविषयी थेट बोलायचे उध्दव ठाकरे टाळताहेत. इतका सपेन्स निर्माण करायची ठाकरेंना गरजही नव्हती. त्यांना नीट माहिती आहे की, शिवसेना दुंभगली तेव्हाच शिंदेसेनेच्या सदा सरवणकरांनी ५०टक्के मते घेतली. तरीही ते त्यावर स्पष्ट बोलत नाहीत.
- विधानसभा निवडणुकांत महाराष्ट्रात भाजप नंबर एकचा पक्ष असल्याचा अहवाल गुप्तचरांनी दिला. उमेदवारांचे कार्य व अवतीभोवतालची परिस्थिती पाहता विरोधकांसाठी पोषक वातावरण नाही असे स्पष्ट मत अहवालांतच व्यक्त केल्याने मविआचे धाब दणाणलयं.
- आदित्य ठाकरेंच्या वरळी मतदारसंघात राज ठाकरेंनी त्यांच्या संदिप देशपांडे यांच्यासाठी प्रचारसभा घेत उध्दव ठाकरेंवर यथेच्छ टिका करताना आदित्यचे नाव घेण टाळले.त्यामुळे सर्वसामान्यातील कुतूहल वाढले असले तरी मनसेचा मतांचा टक्का वाढण्याचीचिन्हे नाहीत.
- मौलवी उध्दव ठाकरेंसाठी फतवे काढत आहेत. आज बाळासाहेब असते तर त्यांना काय वाटले असते? असे सडेतोड सवाल राज ठाकरेंनी केले. पण राजनी शिवसेना त्यागताना काय काय भाष्य केल ते आठवावे. तेव्हा बाळासाहेबांना काय वाटेल? याचा विचार कधी केला होता का?
- सदाभाऊ खोतांनी शरद पवारांच्या आजाराविषयी भाष्य केल्याने त्यांच्याविरुध्द चोहोबाजूने टिकेची झोड उठली. परंतु पवारांच्या आजारावर हे असे पहिले भाष्य नाही. यापूर्वी अनेकदा नेत्यांनीच भान न बाळगता पवारांना लक्ष करताना हिन पातळी गाठली आहे.

मानखुर्दमध्ये २२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

अबू आझमींसमोर गड राखण्याचे आव्हान

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई - पूर्व उपनगरातील ईशान्य लोकसभा मतदारसंघात मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ येतो. अबू आसिम आझमी यांनी या मतदारसंघाचे तीन वेळा प्रतिनिधित्व केले आहे. या मतदारसंघावर आपला झेंडा फडकवावा यासाठी महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि एकनाथ शिंदेंची शिवसेना एकमेकांविरोधात उभी ठाकली आहे. त्यामुळे महायुतीचे नेते या मतदारसंघात एकमेकांविरोधात प्रचार करताना दिसणार आहेत. या मतदारसंघातून २२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट, समाजवादी पार्टी या चार पक्षांच्या उमेदवारांमध्ये लढत होणार आहे. त्यामुळे येथून तीन वेळा जिंकलेले अबू आसिम आझमी यांच्यासमोर आपला गड राखण्याचे आव्हान आहे.

मुंबईतील घनकचरा टाकण्यात येणारे सर्वात मोठे देवनार डम्पिंग ग्राऊंड याच मतदारसंघात येते. या मतदारसंघातून हे डम्पिंग ग्राऊंड हलविण्यात यावे यासाठी अबू आझमी सातत्याने पाठपुरावा करत आहेत. पंधरा वर्षांपासून ते या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. महायुतीमधील शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने एकमेकांविरोधात उमेदवार उभे केले आहेत. त्यामुळे याचा फायदा नेमका कोणास होणार हे निकालनंतर स्पष्ट होणार आहे. २०१९ च्या निवडणुकीत आझमी यांनी २५ हजार ६१३ मताधिक्य मिळवत विजयाची हॅट्ट्रीक केली होती.

यंदाच्या निवडणुकीत नवाब मलिक हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार आहेत. मलिक यांच्यावर आरोप असल्याने भाजपने या मतदारसंघात मलिकांचा प्रचार करणार नसल्याचे जाहीर केले आहे. यातच एकनाथ शिंदे गटाकडून सुरेश पाटील निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. त्यामुळे या मतदारसंघात महायुतीमधील नेते एकमेकांविरोधात उभे ठाकले आहेत. या मतदारसंघात मुस्लिम, मराठी आणि उत्तर भारतीय मतदार उमेदवारांचे भवितव्य ठरवणार आहेत. महायुतीमधील उमेदवार एकमेकांविरोधात असल्याने याचा फायदा अबू आझमी यांना होऊ शकतो का? हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

न्यायालयीन प्रकरणांत दिरंगाई नको; गगराणी यांचा इशारा

■ प्रतिनिधी, मुंबई

न्यायालयीन प्रकरण हाताळताना दिरंगाई व निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी विधि विभागातील अधिकाऱ्यांना दिला आहे. विधी खात्यातील अधिकाऱ्यांनी न्यायालयात दाखल होणाऱ्या म हापालिकेच्या संबंधित सर्व न्यायिक प्रकरणांचा नियमितपणे आढावा घ्यावा. कार्यवाहीचे सर्व महत्वाचे टप्पे ठरवून त्याविषयी वेळापत्रक निश्चित करावे. विधि अधिकाऱ्यांनी अधिक दक्षतेने व जबाबदारीने न्यायालयीन कामकाज हाताळावे, असे आदेशही महापालिका आयुक्तांनी दिले आहेत. पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी विधि विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी बुधवारी संवाद साधला. त्यावेळी, त्यांनी हे आदेश दिले. भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालयातील पेंग्विन कक्षाच्या सभागृहात ही बैठक पार पडली. पालिकेशी संबंधित विविध प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत.

मुंबई विद्यापीठातर्फे नियोजित परीक्षेच्या वेळापत्रकात बदल

एलएलएम प्रवेशपूर्व परीक्षा १७ नोव्हेंबरला

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई विद्यापीठातर्फे नियोजित केलेल्या एलएलएम प्रवेशपूर्व परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. १० नोव्हेंबरला होणाऱ्या ऑनलाईन सीबीटी परीक्षेच्या वेळापत्रकात बदल केला आहे. नवीन वेळापत्रकानुसार ही परीक्षा १७ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या परीक्षेसाठी आजमितीस सुमारे ४ हजार ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर केले आहेत. मुंबई विद्यापीठाने ७ ते १४ नोव्हेंबर दरम्यान संपूर्ण भारतात आयआयबीएफच्या माध्यम तून सीओ/पीओच्या परीक्षा नियोजित केली आहे. परीक्षार्थींना संभाव्य अडचण उद्भवू नये, यासाठी विद्यार्थी हित लक्षात घेता ही ऑनलाईन एलएलएम प्रवेशपूर्व परीक्षा १० नोव्हेंबरऐवजी १७ नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ. पूजा रौंदळे यांनी सांगितले.

भूलेश्वर परिसरात २ कोटी ३० लाखांची रोकड जप्त

मुंबई : मुंबईच्या भूलेश्वर परिसरात भरारी पथकाने २ कोटी ३० लाख ८६ हजारांची रोकड जप्त केली. रोकड घेऊन जाणाऱ्या १२ जणांना भरारी पथकाने ताब्यात घेतले असून पोलीस चौकशी करत आहेत. ठिकठिकाणी निवडणूक आयोगाकडून पोलिसांच्या चौकी तयार करण्यात आल्या आहेत. भरारी पथके तयार करण्यात आलेली आहेत. भरारी पथकाने २ कोटी ३० लाख ८६ हजारांची रोकड जप्त केली. ही रोकड मिळाल्यानंतर १८६ मुंबादेवी विधानसभा मतदारसंघाचे एफ.एस.टी. पथकास घटनास्थळी पाचारण करण्यात आले. एफ. एस.टी. पथक नोडल अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या रोकडची व्हिडीओग्राफी करुन संशयितांना लो.टी.मार्ग पोलीस ठाणे येथे पुढील कारवाईसाठी आणण्यात आले आहे.

मुंबईकरांना मधुमेहाच्या आजाराचा विळखा

जीवनशैलीशी आजारांमध्ये दशकभरात ४८५ टक्के वाढ

■ प्रतिनिधी, मुंबई

२०१४ ते २०२३ या दहा वर्षांतील रुग्णालयीन नोंदीचा अभ्यास केल्यानंतर मुंबईत जीवनशैलीशी निगडित अशा मधुमेहांसारख्या आजारांनी होत असलेल्या मृत्यूंची संख्या ४८५ टक्क्यांनी वाढली आहे. मृत्यूंच्या कारणामध्ये मधुमेह हे सर्वात वरचे कारण आहे, एका सामाजिक संस्थेच्या अहवालात म्हटले आहे.

२०१४ ते २०२२ या काळात झालेल्या मृत्यूंच्या कारणांचा विचार केला असता त्यात मधुमेह, श्वसनाचे गंभीर आजार, क्षयरोग आणि उच्च रक्तदाब यांचा क्रमांक लागतो. जीवनशैलीशी निगडित मधुम ेहासारख्या आजारांनी २०१४ मध्ये २,४२८ मृत्यू झाले, तर २०२२ पर्यंत ते १४ हजार २०७ वर पोहोचले. ही वाढ ४८५ टक्के आहे.

संस्थेच्या एका अधिकाऱ्यानुसार, जीवनशैलीशी निगडित मधुमेहासारखे आजार आटोक्यात आणण्यासाठी शहरी नियोजन आणि विकासाच्या संदर्भात भारत सरकारचे शहरी आणि प्रादेशिक विकास योजना आखणी आणि अंमलबजावणी (यूआरडीपीएफआय) धोरण दिशादर्शक ठरते. त्याची अंमलबजावणी मुंबई महापालिकेने केली पाहिजे.

मुंबईत लोकांच्या आरोग्यासाठी मोकळ्या जागा वाढवायच्या असतील तर सध्या ज्या जागा आराखड्यात राखून ठेवल्या आहेत, त्या तत्काळ ताब्यात घेतल्या पाहिजेत. मुंबईला पश्चिम आणि पूर्व समुद्रकिनाऱ्याच्या रूपाने मोठी खुली जागा असली तरी ती लोकांसाठी उपलब्ध होत नाही. मुंबईच्या मधोमध राष्ट्रीय उद्यान असून तेथेही लोकांना मुक्त प्रवेश नाही. राजकीय नेतृत्व याबाबत उदासीन आहे. शहर नियोजनाचे काम विभागस्तरावर केल्यास लोकांना मोकळ्या जागा सहजपणे उपलब्ध होतील. त्यासाठी नियोजनाचे विकेंद्रीकरण व्हायला पाहिजे, असे मत या अधिकाऱ्याने व्यक्त केले.

DYNAMIC MICROSTEPPERS LIMITED

CIN: L45206MH1985PLC036261

Reg Office: 506, Marathu Arcade, Above Axis Bank, Near Garware Subhash Road, Vile Parle (East) Mumbai - 400 057, Maharashtra, India. Tel No.: 022-26842631 Fax No.: 022-26842631 Email id: dynamicmicrostepperslimited@gmail.com Website: www.dynamicmicrosteppers.com

EXTRACT OF THE STANDALONE UN-AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED SEPTEMBER 30, 2024

Amount in INR

Sr. No.	Particulars	Standalone					
		Quarter ended			Half Year ended		Year Ended
		30.09.2024 (Unaudited)	30.06.2024 (Unaudited)	30.09.2023 (Unaudited)	30.09.2024 (Unaudited)	30.09.2023 (Unaudited)	31.03.2024 (Audited)
1	Total Income from operations	-	-	-	-	-	-
2	Net Profit (+)/Loss for the period (before tax, Exceptional and/or Extraodinary items)	(313,430)	(874,364)	(86,639)	(1,187,794)	(584,511)	(1,038,376)
3	Net Profit (+)/Loss for the period before tax (after Exceptional and/or Extraodinary items)	(313,430)	(874,364)	(86,639)	(1,187,794)	(584,511)	(1,038,376)
4	Net Profit (+)/Loss for the period after tax (after Exceptional and/or Extraodinary items)	(313,430)	(874,364)	(86,639)	(1,187,794)	(584,511)	(1,038,376)
5	Total Comprehensive Income for the period [(Comprising profit/Loss for the period (after tax) and other Comprehensive Income (after tax)]	(313,430)	(874,364)	(86,639)	(1,187,794)	(584,511)	(1,038,376)
6	Equity share capital	34,488,000	34,488,000	34,488,000	34,488,000	34,488,000	34,488,000
7	Reserves (excuding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year						(46,101,049)
8	Earning per share (of Rs. 10/- each) for continuing and discontinued operations-						
	a. Basic:	(0.09)	(0.25)	(0.03)	(0.34)	(0.17)	(0.30)
	b. Diluted:	(0.09)	(0.25)	(0.03)	(0.34)	(0.17)	(0.30)

Notes:
1 The above is an extract of the detailed format of quarterly un-audited Financial Results for the Quarter and Half Year Ended 30.09.2024 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly un-audited Financial Results are available on the websites of the Stock Exchange (www.bseindia.com) and the website of the Company (www.dynamicmicerosteppers.com)
2 Previous year's figures have been regrouped/rearranged wherever necessary to make them comparable.
3 The above results, has been reviewed and recommended by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on 08th November, 2024 as per Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.

Place: Mumbai
Date: 08/11/2024

For Dynamic Microsteppers Limited
Sd/- Ashwin Shah
Director DIN: 03115009

Cni RESEARCH LIMITED

Regd. Office: A-120, Gokul Arcade, Sahar Road, Vile Parle (East), Mumbai - 400 057.
CIN No. : L45202MH1982PLC041643
Email id: chamatcar@chamatcar.com **Contact:** 022-49737861

Statement of Standalone Unaudited Results for the Quarter ended 30/09/2024

(Rs. In Lacs/amount)

	Particulars	Current Quarter ending 30-09-2024 (Un-Audited)	Preceding 3 months ended 30-06-2024 (Un-audited)	Corresponding 3 months ended in the previous year 30-09-2023 (Un-audited)	Year to date (Six Months ended) 30-09-2024 (Un-Audited)	Corresponding year to date ended in the previous year 30-09-2023 (Un-Audited)	Year ended 31-03-2024 (Audited)
1	Total Income from Operations	16.67	418.55	264.52	435.22	573.58	1042.05
2	Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items#)	(316.14)	21.78	15.48	(294.36)	77.13	84.99
3	Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional items and/or Extraordinary items#)	(316.14)	21.78	15.48	(294.36)	77.13	84.99
4	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#)	(316.14)	21.78	15.48	(294.36)	77.13	83.51
5	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	35.09	170.59	(80.84)	205.68	211.23	545.21
6	Equity Share Capital	1148.05	1148.05	1148.05	1148.05	1148.05	1148.05
7	Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year	343.36	343.36	343.36	343.36	343.36	343.36
8	Earnings Per Share (of Re. 1/- each) (for continuing and discontinued operations) -						
	1) Basic:	(0.28)	0.02	0.01	(0.26)	0.07	0.07
	2) Diluted:	(0.28)	0.02	0.01	(0.26)	0.07	0.07

Notes:
a) The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity. (URL of the filings).
b) The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote.
c) # - Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

Place : Mumbai
Date : 08/11/2024

FOR CNI RESEARCH LIMITED
Sd/-
KISHOR P OSTWAL
DIRECTOR
DIN: 00460257